ग्रंथमालिका ‘गुरु’ : खंड ४

# गुरूंचे शिष्यांना शिकवणे आणि गुरु-शिष्य संबंध

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**




**सनातन संस्था**


ऑगस्ट २०२३ पर्यंत सनातनच्या ३६२ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९४ लाख १८ सहस्र प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. ३.९.२०२३ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२७ अन् अन्य ८९८ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही सूत्रांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)**


**१. शिष्याला ज्ञान देण्याच्या दृष्टीने गुरूंचे महत्त्व** ९

**२. गुरूंचे शिष्यांना शिकवणे** ९

२ अ. कवितेतून शिकवणे १०

२ आ. भजनातून शिकवणे ११

२ इ. सुवचनातून शिकवणे १२

२ ई. प्रत्यक्ष शिकवणे १२

२ उ. विनोदातून शिकवणे २२

२ ऊ. वागण्यातून (अप्रत्यक्ष) शिकवणे २३

२ ए. अनुभूतीतून शिकवणे २ ऐ. परीक्षेतून शिकवणे २४

२ ओ. स्वप्नातून शिकवणे २५

२ औ. शब्दातीत माध्यमातून (सूक्ष्मातून) शिकवणे २६

२ अं. स्थुलातून सूक्ष्माकडे नेणे २८

२ क. पंचतत्त्वात्मक स्वरूपात शिकवणे २९

**३. गुरु–शिष्य संबंध** ३५

३ अ. शिष्याच्या मागच्या जन्माच्या पुण्याईमुळे गुरु साधकाच्या जीवनात येणे ३५

३ आ. शिष्याची लौकिक दृष्टीने काळजी घेणे ३६

३ इ. शिष्याची आर्थिक स्थिती लक्षात घेणे ३८

३ ई. शिष्याचे संकट दूर करणे ४०

३ उ. शिष्याची इच्छा पूर्ण करणे ४०

३ ऊ. शिष्याच्या अपराधाविषयीचा दृष्टीकोन ४१

३ ए. गुरूंचा शिष्यांकडे पहाण्याचा दृष्टीकोन ४१

३ ऐ. शिष्यासाठी द्वैतात येणे ४४

३ ओ. शिष्याला पूर्वसूचना देणे ४५

३ औ. शिष्याच्या घरी जाणे ४५

३ अं. शिष्याशी एकरूपता ३ क. शिष्याची सेवा ४६

३ ख. शिष्याचा सूक्ष्म 'मी'पणा घालवणे ४७

३ ग. गुरूंचा आशीर्वाद ४८

३ च. शिष्याने स्वावलंबी बनण्यात आणि प्रगती करून पुढे जाण्यातच गुरूंना आनंद वाटणे ५०

३ छ. शिष्याला संतपदानंतरच्या पुढच्या प्रगतीविषयी मार्गदर्शन करणे ५२

३ ज. शिष्याचा रोग आणि मृत्यू ५३

३ झ. इतर गुरूंच्या शिष्यांशी वागणे ५६

३ ट. शिष्यांमुळे होणारी गुरूंची हानी आणि लाभ ५७

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ६२

# ग्रंथाचे मनोगत

'ज्ञानियांचा राजा गुरु महाराव', असे संत ज्ञानदेवांनी म्हटले आहे. ज्ञान देतात, ते गुरु ! शिळेपासून शिल्प बनू शकते; पण त्यासाठी शिल्पकार लागतो. त्याचप्रमाणे साधक आणि शिष्य ईश्वराला प्राप्त करू शकतात; पण त्यासाठी गुरूंची आवश्यकता असते. गुरूंनी आपल्या बोधामृताने साधक आणि शिष्य यांचे अज्ञान दूर केल्यावरच त्यांना ईश्वरप्राप्ती होते.

साधक आणि शिष्य यांनी साधना करतांना त्यांनी काय केले पाहिजे, काय त्यागले पाहिजे आदींची जाणीव गुरु करून देतात. केवळ उपदेशातूनच नव्हे, तर सर्वसाधारण वाटणाऱ्या वागण्या-बोलण्यातूनही गुरु बरंच काही शिकवतात. साधक आणि शिष्य यांना गुरूंच्या वागण्या-बोलण्याचा भावार्थ न कळल्यास ते गुरूंच्या अमूल्य विचारधनाला मुकतात. गुरूंच्या शिकवण्याच्या विविध पद्धती, उदा. अनुभूतीतून शिकवणे, परीक्षेतून शिकवणे प्रस्तुत ग्रंथात उदाहरणांसहित दिल्या आहेत. त्यामुळे गुरूंकडून वेगवेगळ्या अंगांनी कसे शिकायचे आणि त्यांचा खऱ्या अर्थाने कसा लाभ करून घ्यायचा, याची एक नवी दृष्टी विकसित व्हायला साहाय्य होईल.

आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज (बाबा) नेहमी म्हणायचे, 'मी कोणाचा गुरु नाही; पण शिष्य केल्याविना सोडणार नाही !' शिष्य म्हणजे 'तत्त्वमसि'चा शिष्य, म्हणजे गुरुतत्त्वाचा शिष्य ! संकलकांपैकी डॉ. जयंत आठवले हेही स्वतःला 'गुरु' समजत नाहीत, तर 'बाबांचा शिष्य' या भावातच रहातात. असे असले तरी बाबांच्याच शिकवणीप्रमाणे साधकांना गुरुतत्त्वाचे शिष्य बनवण्यासाठी मात्र रात्रंदिवस प्रयत्नशील असतात. 'सनातन संस्थे'चे साधक त्यांना 'परात्पर गुरु' या रूपात पहातात. यासाठीच डॉक्टरांनी साधकांना शिकवण्याविषयीची अनेक उदाहरणेही ग्रंथात दिली आहेत.

'या ग्रंथाद्वारे जिज्ञासू, साधक आणि शिष्य यांना साधनेसाठी आवश्यक ज्ञान चांगल्या प्रकारे आत्मसात् करता येवो आणि त्यांचा प्रवास शीघ्रतेने ईश्वरप्राप्तीच्या दिशेने होवो', अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**